CMYK

बीड । सोमवार
०७.०४.२०२५
वर्षे : ५ अंक : ०८
किंमत : ३ रू. पाने : ४

दैनिक ● www.marathwadapatra.com

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■




dailymarathwadapatra2021@gmail.com RNI:Reg.NO.MAH/MAR/2021/80074 Post:Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 Mob:9822152955 

# सर्वत्र श्रीराम जन्मोत्सव मोठ्या आनंदोउत्साहात साजरा

## बीड शहरात मोटारसायकल रॅलीने सुरुवात









**बीड । प्रतिनिधी**

रामनवमी हा हिंदू धर्मातील एक मोठा प्रमुख सण मानला जातो प्रभू श्रीरामाचा जन्मोत्सव म्हणून भारतात साजरा केला जातो. चैत्र मास शुक्ल पक्षातील नवमी तिथीला रामनवमी साजरी केली जाते. धार्मिक मान्यतानुसार, या दिवशी अयोध्येच्या राजा दशरथ आणि माता कौशल्याच्या घरी प्रभू श्रीरामांचा जन्म झाला होता. प्रभू श्रीराम म्हणजे भगवान विष्णू यांचा अवतार असून त्यांना मर्यादा पुरुषोत्तम असेही म्हणतात. रामनवमी उत्सव हा देशमभरात मोठ्या आनंदाच्या वातावरणात साजरा केला जातो. रामनवमी बीड जिल्ह्यात सुद्धा मोठ्या उत्साहात साजरा होत असून तालुक्यातील रामगड येथे हा उत्सव मोठ्या आनंदात साजरा करण्यात आला. तसेच बीड शहरात रामनवमीनिमित्त युवकांच्या वतीने मोटारसायल रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. दुपारनंतर भव्यदिव्य अशी शोभायात्राही काढण्यात येणार आहे. रामनवमीच्या दिवशी मठ आणि मंदिरामध्ये यज्ञ आणि नर नारायण सेवा केली जाते. या दिवशी घरी पूजा आणि यज्ञ केल्याने घरात सुख समृद्धी येते आणि देवी लक्ष्मीही प्रसन्न होते. माता सीतेला देवी लक्ष्मीचे स्वरूप मानले जाते. भगवान रामासोबत सीतेची उपासना केल्याने देवी लक्ष्मीचा आशीर्वाद मिळतो आणि घरात ऐश्वर्य वाढते, अशी मान्यता आहे.

### प्रभू रामाचे चरित्र आदर्श घेण्यासारखे : श्रीमान कृष्णमेधा प्रभू

बीड येथील श्री श्री राधागोविंद मंदिरातर्फे ३१ मार्च ते ६ एप्रिल पर्यंत श्रीराम कथेचे आयोजन करण्यात आले होते.

दक्षिणे लक्ष्मण यस्य वामे च जनकात्मज ! पुरतो मारुतीर्यस्य तं वंदे रघुनंदनम् !!

ज्यांच्या उजवीकडे लक्ष्मण, डाव्या बाजूस जनकात्मजा सीता व पुढ्यात हनुमान विराजमान आहेत. अशा प्रभू रामचंद्रांना मी वंदन करतो. श्रीराम नवमीच्या दिवशी सिताराम लक्ष्मण हनुमान यांचा अभिषेक, श्रीराम कथा इस्कॉन पालनपुर चे अध्यक्ष श्रीमान कृष्णमेधा प्रभू यांनी सात दिवसीय ▶▶ उर्वरित पान २ वर

# सामाजिक एकोपा जोपासण्यासाठी

## रिपाइंचा ईद ए-मिलाफ





**बीड । प्रतिनिधी**

हिंदू-मुस्लिमांच्या ऐक्याचे प्रतिक असलेल्या पवित्र रमजान ईदचे औचित्य साधून हिंदू-मुस्लिम भाईचारा वाढविण्यासाठी युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष पप्पू कागदे यांच्या वतीने दरवर्षीप्रमाणे याही वर्षी हिंदू-मुस्लिम समाज बांधवांना ईदच्या शुभेच्छा देण्यासाठी व सामाजिक एकोपा जोपासण्यासाठी बीड शहर रिपाइंच्या वतीने बशीरगंज चौक बीड येथे रविवार (दि.६) एप्रिल २०२५ रोजी हजारो हिंदू-मुस्लिम बांधवांच्या उपस्थितीत ईद ए-मिलाफ कार्यक्रम संपन्न झाला. भारताची एकात्मता व देशातील सर्व धर्मीय भाईचारा व बंधुता टिकून ठेवण्यासाठी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी समता, स्वातंत्र्य व बंधुताचा संदेश देत भारत एक संघ ठेवण्याचे महान कार्य केले. सामाजिक एकोपा जोपासण्यासाठी व हिंदू-मुस्लिम भाईचारा वाढविण्यासाठी गेल्या चौदा वर्षापासून रिपाइंच्या वतीने केले जात आहे. आगामी काळातही समता, स्वातंत्र्य,बंधुता व एकोपा जोपासण्यासाठी सर्व धर्मीयांना सोबत घेऊन ईद ए-मिलाफच्या माध्यमातून सुरू राहणार आहे. रिपाइंच्या वतीने युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष पप्पू कागदे यांनी आयोजित केलेल्या ईद-ए-मिलाफच्या कार्यक्रमास माजी आ.राजेंद्र जगतप, जनार्धन तुपे, मोईन मास्तर, सय्यद सलीम, आ. विजयसिंह पंडित, डॉ.योगेश क्षीरसागर, सुशीलाताई मोराळे, तय्यबभाई, जावेद कुरेशी, फारूक पटेल, ॲड.बाळासाहेब राख, उल्हास गिराम, बीड तहसीलदार चंद्रकांत शेळके, पोलीस उपविभागीय अधिकारी विश्वंभर गोल्डे, अशोक लोढा, अमृत सारडा, नवनाथ शिराळे, शेख शफिक भाऊ, चंद्रकांत नवले, अशोक हिंगे, रंजित क्षीरसागर, शेख इकबाल, जलील पठाण,

▶▶ उर्वरित पान २ वर

*बीड पासून जवळच असलेल्या आनंदग्राम च्या डोंगराला रात्री आठ वाजता आग लागली बघता बघता आगीने रौद्र रूप धारण केले. अग्निशमन ची गाडी येईपर्यंत मुलांनी कळशा बकेटी घागरीने पटापट पाणी पुरवठा केला म्हणून जवळपास ची झाड वाचली पण बेचाळीस एककर पेक्षा जास्त डोंगर जळुन खाक झाला. रात्री दोन वाजता आग आटोक्यात आणली.*



*आतापर्यंत सात वेळा दर उन्हाळ्यात अशी घटना घडतेच, सुदैवाने जिवीत हानी झाली नाही पण त्यात मुलांनी लावलेली छोटी मोठी झाडे पाईप ठिबक जळाऊ लाकुड असं जळुन गेलं होतं. अग्निशामक दलाने तत्परता दाखवल्यामुळे अनर्थ टळला.- प्रकल्प संचालक दत्ता बारगजे*



*बीड दैनिक मराठवाडा पत्र च्या वर्धापन दिनानिमित्त संपादक दत्तात्रय नरनाळे यांना शुभेच्छा देताना शिवाजीराव कवठेकर, गोविंद सव्वाशे, विनोद आप्पा इंगोले, परमेश्वर कवचट, नारायण थोरात, भागवत मस्के, बंडू आप्पा कोलंगडे, विलास इंगोले आदी छायाचित्रात दिसत आहेत.*

# गृह राज्यमंत्री योगेश कदम यांचा मोबाईल चोरी गेलाच नाही, विरोधकांनी अफवा पसरवने बंद करावे : अनिलदादा जगताप

**बीड । प्रतिनिधी**



बीड जिल्हा दौऱ्यावर असताना गृहराज्यमंत्री योगेश कदम यांचा मोबाईल चोरी गेल्याच्या बातम्या शनिवारी दिवसभर सर्व टीव्ही चॅनलवर, पोर्टलवर सुरु होत्या. मंत्र्यांच्या मोबाईल चोरीच्या बातमीने राज्यभर खळबळ उडवून दिली. मंत्र्यांचाच मोबाईल सुरक्षित नाही तिथे सर्वसामान्यांचे काय? असा प्रश्न देखील नेत्यांमधून उपस्थित होऊ लागला होता. या सर्व प्रकारानंतर शनिवारी रात्री उशिरा बीड पोलीस अधीक्षकांनी मोबाईल फोन विसरला होता नंतर तो कोणीतरी आणून दिला असे स्पष्टीकरणही दिले आहे. मात्र विरोधक आऊचा बाऊ करून सोशल मीडियावर अफवांचे वावडळ आणत आहेत. याबद्दल शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांनी पत्रक कढून सविस्तर माहिती दिली आहे की, विविध समाज माध्यमांवर व विविध न्यूज पोर्टलवर मा. योगेश कदम, राज्यमंत्री (गृह) महाराष्ट्र राज्य हे मस्साजोग ता. केज येथे आलेले असतांना त्यांचा मोबाईल गहाळ/चोरी गेल्याची बातमी प्रसारित झाली. परंतु सदर बाबत सत्यता अशी आहे की, मा. मंत्री महोदय हे मस्साजोग येथे धनंजय देशमुख ▶▶ उर्वरित पान २ वर

# जगाला एकात्मतेची शिकवण देणारे संत कैकाडी महाराज यांची जयंती व रामनवमी उत्साहात साजरी



**लिंबागणेश । प्रतिनिधी**

मानवानो माणुसकीला जागा हा महामंत्र देणारे राष्ट्रसंत,महान तपस्वी संत राजाराम महाराज म्हणजेच कैकाडी महाराज यांची जयंती आणि रामनवमी आज दि.०६ रविवार रोजी बीड तालुक्यातील लिंबागणेश येथील ग्रामपंचायत कार्यालयात प्रभु राम चंद्र आणि कैकाडी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून श्रीफळ फोडून मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी सरपंच बालासाहेब जाधव होते.कार्यक्रमाचे प्रस्तावित रमेश गायकवाड यांनी केले तर सुत्रसंचलन हरिओम क्षीरसागर यांनी केले. डॉ.गणेश ढवळे यांनी आभार मानले. संत कैकाडी महाराज यांच्या जीवनकार्याची महती वर्णन करताना प्रा .लेनाजी गायकवाड यांनी संत कैकाडी कैकाडी ! दरारा आसमंती!! कुळ -विठुचे लावुन! खनिल्या विषमतेच्या भिंती!!

▶▶ उर्वरित पान २ वर

# श्रीरामनवमीला क्षेत्र रामगडावर हजारो भाविकांनी घेतले दर्शन




**बीड । प्रतिनिधी**

माझ्या गावात श्रीरामांचे मंदिर आहे, तिथेही विविध कार्यक्रम असतात परंतू मी श्री क्षेत्र रामगड येथे आवर्जून उपस्थित राहिलो. या गडाच्या विकासासाठी मी कायम कटीबद्ध असून मी असेपर्यंत श्रीरामनवमीला होणारी महापंगत ही माझी असणार असल्याचे खासदार बजरंग सोनवणे यांनी सांगितले. श्रीराम नवमीनिमित्त श्री क्षेत्र रामगड येथे मोठा यात्रोत्सव असतो, तसेच या गडाच्या ४६ व्या फिरत्या नारळी सप्ताहाची सांगताही रविवार, ६ एप्रिल रोजी महंत स्वामी योगीराज महाराज यांच्या काल्याच्या कीर्तनाने झाली. यावेळी खा.बजरंग सोनवणे, आ.विजयसिंह पंडित, माजी मंत्री बदामराव पंडित, राजेंद्र मस्के, कुंडलिक खांडे, दिलीप गोरे, गणेश वरेकर, परमेश्वर सातपुते, शिवराज पवार आदींची उपस्थिती होती. हजारो भाविकांनी दर्शनासाठी गर्दी केली होती. महंत स्वामी योगीराज ▶▶ उर्वरित पान २ वर





CMYK

# दररोज मोठ्या प्रमाणात मंद विषाचे सेवन

आजच्या आधुनिक युगात माणसाने जशी प्रगती केली आहे, त्याच प्रमाणात, आरोग्याशीही तडजोड झाली आणि ती काळानुसार सतत वाढत आहे, ज्याचे कारण मानव स्वतः आहे. हृदयरोग, मेंदूचा झटका, कर्करोग यासारखे प्राणघातक आजार झपाट्याने वाढत आहेत, त्यासोबतच मधुमेह, रक्तदाब, लठ्ठपणा, अशक्तपणा, आहारात पोषक तत्वांचा अभाव या समस्या शिगेला पोहोचल्या आहेत, त्यामुळे अकाली मृत्यूची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. काही क्षणांपूर्वी पूर्णपणे निरोगी दिसणारी व्यक्ती, प्रौढांपासून ते लहान मुलांपर्यंत, खेळताना किंवा व्यायाम करताना किंवा बसल्याबसून देखील बेशुद्ध पडतात आणि अनेकदा त्यांचा मृत्यू झाल्याचे कळते. दशकापूर्वी आपण ज्या प्राणघातक आजारांबद्दल क्वचितच ऐकायचो, ते आता आपल्या नातेवाईक, शेजारी आणि कुटुंबातील सदस्यांपर्यंत पोहोचले आहे. मानवाचे शारीरिक आणि मानसिक आरोग्य अत्यंत कमकुवत झाले आहे; हवामान बदलताच, लोक पटकन आजारी होतात. आपल्या देशातील सरासरी वयाचा दर पाश्चात्य देशांच्या तुलनेत सतत कमी होत आहे. २०२४ च्या जागतिक आनंद अहवालात भारत १४३ देशांपैकी १२६ व्या क्रमांकावर आहे. आनंदाच्या बाबतीत भारत पाकिस्तान, लिबिया, इराक, पॅलेस्टाईन आणि नायजर सारख्या देशांपेक्षाही मागे आहे. आजार वेगाने का वाढत आहेत या समस्येबद्दल तुम्ही कधी गांभीर्याने विचार केला आहे का? काय कारण असू शकते? निरोगी जीवन जगण्यासाठी आपल्याला दररोज पुरेशा प्रमाणात शुद्ध ऑक्सिजन, स्वच्छ पाणी आणि पौष्टिक अन्न मिळत आहे का?

प्रदूषण आणि अस्वच्छता आपला श्वास रोखत आहेत. २०२४ च्या एअर क्वालिटी इंडेक्सच्या आकडेवारीनुसार, भारत जगातील पाच सर्वात प्रदूषित देशांमध्ये समाविष्ट आहे. भारतातील सुमारे ७० टक्के पाणी प्रदूषित आहे आणि देशातील जवळजवळ अर्ध्या नद्या पिण्यासाठी किंवा सिंचनासाठी असुरक्षित आहेत, यामुळे, २०२४ च्या जागतिक जल गुणवत्ता निर्देशांकात भारत १२२ देशांपैकी १२० व्या क्रमांकावर आहे. २०२३ मध्ये बीएमजेमध्ये प्रकाशित झालेल्या एका अभ्यासात असे आढळून आले की भारतात दरवर्षी २.१८ दशलक्ष मृत्यू बाहेरील वायू प्रदूषणामुळे होतात. लॅन्सेट २०१९ मध्ये प्रकाशित झालेल्या एका अभ्यासात असे आढळून आले आहे की भारतात ५,००,००० हून अधिक मृत्यू जल प्रदूषणामुळे झाले आहेत. देशात हजारो कोटी रुपयांच्या बनावट औषधांचा मोठा व्यवसाय आहे, मोठ्या सरकारी रुग्णालयांमध्येही रुग्णांना बनावट औषधे वाटली जातात. आशियातील सर्वात मोठ्या रुग्णालयांमध्ये समाविष्ट असलेल्या महाराष्ट्र राज्यातील नागपूर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयात ही घटना नुकतीच उघडकीस आली.




धान्य पिकवण्यापासून ते आपल्या ताटात वाढण्यापर्यंत, त्यांना अनेक हानिकारक रासायनिक प्रक्रियांमधून जावे लागते. देशात अशुद्ध अन्न आणि अस्वच्छतेची समस्या खूप मोठी आहे. लोक स्वार्थ आणि लोभात इतके आंधळे झाले आहेत की ते एका रुपयाच्या फायद्यासाठी देखील इतरांना विष पाजण्यास तयार आहेत. अलिकडेच कोल्हापूरमधून बातमी आली की मृतदेहांवर वापरला जाणारा बर्फ बाजारात मिळणाऱ्या थंड पेयांमध्ये वापरला जात आहे. आश्चर्यकारक आहे, की आपल्या देशात जेवळे दूध उत्पन्न होत नाही त्यापेक्षा जास्त दूध विकल्या जाते. देशातील ६८.७ टक्के दूध आणि दुग्धजन्य पदार्थांमध्ये प्रदूषक आढळून आले आहेत. तेल, तूप, गोड, नमकीन आणि मैदा सारख्या अन्नपदार्थांची मोठी मागणी आहे, जेव्हाकी ह्या पदार्थांचा आरोग्यावर खूप वाईट परिणाम होतो. मध, मसाले, चहापत्ती, तेल, दूध, मिठाई, तूप आणि केशर सारख्या अन्नपदार्थांमध्ये मोठ्या प्रमाणात भेसळ आहे. बाहेरील खाद्यपदार्थांचे रंग खूपच चटक आणि आकर्षक दिसतात. बहुतेक खाद्यपदार्थांना रंग देण्यासाठी नैसर्गिक रंगांऐवजी हानिकारक कृत्रिम रंगांचा वापर केला जातो. अन्नपदार्थांमध्ये वापरले जाणारे बाह्य बर्फ, पाणी, चटण्या, सॉसेज, खाद्यतेल हे बहुदा कमाल दर्जाच्या मानकांची पूर्तता करत नाहीत. देशातील बहुतेक स्ट्रीट फूड विक्रेत्यांना ग्लब्स न घालता थेट अन्नपदार्थांना स्पर्श करण्याची खूप वाईट सवय आहे. याचे गंभीर परिणाम ग्राहकांच्या आरोग्याला भोगावे लागत आहे. जे अन्न प्राण्यांसाठीही योग्य नाही, म्हणजेच प्राणघातक कचरा, ते मानव मोठ्या आवडीने खात आहे.

देशातील बहुतेक अन्नपदार्थ पॅकिंग आणि गुंडाळण्यासाठी वर्तमानपत्रांचा वापर केला जातो, जो आरोग्यासाठी धोकादायक आहे. एफएसएसएआयच्या मते, अन्न पॅकेजिंग साहित्य म्हणून शोषक कागदाऐवजी वर्तमानपत्रांचा मोठ्या प्रमाणात वापर होत असल्याने भारतीयांमध्ये अन्न विषाक्तता हळूहळू पसरत आहे. रिफाइंड केलेले पीठ अर्थात मैदा रासायनिकरित्या ब्लीच केलेले (घातक) असते, त्याचा ग्लायसेमिक इंडेक्स जास्त असतो ज्यामुळे टाइप २ मधुमेह होऊ शकतो आणि फायबरच्या कमतरतेमुळे ते पचनसंस्थेसाठी अडथळा ठरते. जंक फूड तयार करण्यासाठी खाद्यतेलाचा मोठ्या प्रमाणात पुनर्वापर केला जातो; तेल वारंवार गरम केल्याने लिपिड्सचे ऑक्सिडेटिव्ह ब्रेकडाउन होते. पुन्हा गरम केलेल्या तेलाने बनवलेले अन्न दीर्घकाळ सेवन केल्यास व्यक्तीच्या अँटिऑक्सिडंट संरक्षण नेटवर्कवर गंभीर परिणाम होऊ शकतो, यामुळे उच्च रक्तदाब, मधुमेह आणि रक्तवाहिन्यांच्या जळजळासारखे विकार होऊ शकतात, नंतर पुढे घातक आजार होतात. जंक फूड किंवा बाहेरील अन्नामुळे उच्च कोलेस्ट्रॉल, हृदयरोग, मधुमेह, मूत्रपिंडाचे नुकसान, लठ्ठपणा, यकृताचे आजार, कर्करोग, दातांचे नुकसान, नैराश्य, पोटाचे विकार, त्वचारोग इत्यादी समस्यांचा धोका वाढतो. पॅकबंद अन्न आणि पेयांमुळे बहुदा आपण मायक्रोप्लास्टिकचे सेवन करत आहोत. भारतातील ५६ टक्के आजार हे अस्वास्थ्यकर आहाराशी संबंधित आहेत. आयुर्वेद म्हणतो की जर आहार योग्य नसेल तर आरोग्य सुधारण्यासाठी औषधही काम करणार नाही.

स्ट्रीट फूडचे आचारी किंवा अन्न विक्रेत्यांनी सरकारी सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे. हात चांगले धुवा, स्वच्छ भांडी आणि उपकरणे वापरा, दुकानात स्वच्छता ठेवा, कच्चे आणि शिजवलेले अन्न वेगवेगळे ठेवा, अन्न तयार करण्यासाठी पिण्याचे पाणी वापरा. अन्न तयार करताना आणि वाढताना स्वच्छ धुतलेले कपडे घाला, ग्लब्स आणि एप्रन घाला. काम करताना तोंड आणि केस झाकून ठेवा, तसेच चेहरा, डोके, केस किंवा शरीराच्या इतर भागांना स्पर्श करणे किंवा खाजवणे टाळा. नखे कापा व स्वच्छता ठेवा. सुरक्षित तापमानात अन्न साठवा, चांगल्या दर्जाचा कच्चा माल निवडा, स्थानिक सरकारी नियमांनुसार कचऱ्याची योग्य प्रकारे विल्हेवाट लावा. तळण्यासाठी त्याच तेलाचा पुनर्वापर करू नका, अन्नपदार्थ झाकून ठेवा, शिळे अन्नपदार्थ विकू नका. हे नियम काटेकोरपणे पाळले पाहिजेत. स्वच्छतेसाठी आणि गुणवत्तेसाठी थोडे जास्त पैसे खर्च करावे लागले तरी ठीक, पण आरोग्याशी तडजोड करू नका.

मरण्यासाठी आता आपल्याला फार दूर जाण्याची गरज नाही, आपल्या सभोवतालचे वातावरण आणि आपली जीवनशैली आपल्याला अकाली मृत्यूकडे वेगाने घेऊन जात आहे. देशातील अनेक व्हायरल फूड व्हिडिओ आणि बातम्यांमध्ये अन्नपदार्थांमधील अशुद्धता, निकृष्ट दर्जाचे अन्नपदार्थ, धोकादायक रासायनिक प्रक्रिया, विषारी रंग आणि भेसळ याबद्दल माहिती मिळतेच. बंद खोल्यांमध्ये तयार होणाऱ्या अनेक अन्नपदार्थांच्या गुणवत्तेबद्दल शंका निर्माण होते, तरीही हे अन्नपदार्थ रस्त्यावर, रेल्वेवर, बसस्थानकांवर आणि सार्वजनिक ठिकाणी खुलेआम विकले जातात. देशात मोठ्या प्रमाणात भेसळीबरोबरच बनावट कंपन्यांचे अन्न आणि पेयेही विकली जातात. आपले आरोग्य आणि आपल्या प्रियजनांच्या आरोग्याची काळजी घेणे ही आपली स्वतःची जबाबदारी आहे; चवीच्या लोभापायी आपले अमूल्य आरोग्य पणाला लावू नका. घरी बनवलेल्या अन्नाला प्राधान्य द्या, दररोज व्यायाम, पुरेशी झोप, स्वच्छता आणि पौष्टिक आहाराची काळजी घ्या. गरम पेये आणि अन्नासाठी प्लास्टिक आणि छापील टाकाऊ कागद वापरू नयेत. शिळे अन्न, तळलेले, मसालेदार, गोड, मैदा असलेले, कृत्रिम रंग, पॅक केलेले अन्न आणि रासायनिक प्रक्रिया केलेले अन्नपदार्थांपासून दूर रहा. गरज पडल्यास, प्रवास करताना किंवा बाहेर जाताना घरून पिण्याचे पाणी आणि जेवणाचा डबा सोबत ठेवा. आरोग्य हीच खरी संपत्ती आहे, आरोग्याची काळजी घ्या, निरोगी आयुष्य जगा.

– डॉ. प्रीतम भी. गेडाम

# रामनवमी –रामरक्षा...
## नित्य पठण करू राम रक्षा




केले प्रभू श्रीराम आपली सुरक्षा! भगवान विष्णूच्या प्रमुख १० अवतारामध्ये मत्स्य अवतार, कुर्मावतार ,वराह अवतार, नरसिंह अवतार ,वामन अवतार ,परशुराम अवतार, दशरथ राम अवतार, श्रीकृष्ण अवतार, गौतम बुद्ध अवतार आणि कल्की अवतार. यामधील श्री विष्णूंचा सातवा अवतार म्हणजेच प्रभू श्रीरामचंद्र. चैत्र शुद्ध नवमी या दिवशी कौशल्या आणि दशरथ यांचा पुत्र त्रेतायुगातले रावणाचे अत्याचार नष्ट करण्यासाठी आणि धर्माची पुनर्स्थापना करण्यासाठी श्रीरामचंद्रांनी जन्म घेतला. एक वचनी, एक पत्नी ,संयमी प्रतिकूल परिस्थितीतही मन स्थिर ठेवणाऱ्या श्री रामचंद्रांची जयंती रामनवमीच्या दिनी दुपारी बारा वाजता जन्म सोहळा आनंदाने उत्साहाने साजरा केला जातो. भक्तांच्या कल्याणासाठी आणि रक्षणासाठी राम रक्षा या महान स्तोत्राचे भगवान शिव यांनी बुध कौशिक ऋषीच्या स्वप्नात जाऊन सांगितले आणि त्यानंतर बुध कौशिक ऋषी यांनी राम रक्षा हे स्तोत्र संस्कृत मध्ये लिहून काढले .या स्तोत्रामध्ये एकूण ३८ श्लोक आहेत यामध्ये सुरुवातीलाच विविध नावांसह विविध अवयवांची डोक्यापासून पायापर्यंत क्रमाने नावे घेत त्या त्या अवयवाचे श्रीराम प्रभूंनी रक्षण करावे अशा आशयाचा मजकूर दिसून येतो .त्यामध्ये मस्तक, कपाळ, डोळे, कान, नाक ,तोंड ,जिभ ,कंठ ,खांदे मनगटापर्यंत हात ,हाताचे पंजे, हृदय ,शरीराच मध्यभाग ,बेंबी, कंबर, मांडी गुडघे ,पोटऱ्या आणि पावले .अशा २० अवयवांचा क्रमाने उल्लेख केला आहे. त्याचबरोबर त्यामध्ये राम स्तुती, रामाची प्रार्थना आणि भक्तांचे पापनाश करण्यासाठी शंभर कोटी श्लोक विस्तृत अशी रामरक्षा आहे. विज्ञानाची कास धरून विचार केला तर रामनाम उच्चारले असता बेंबीच्या देठापासून दीर्घ श्वास सोडताना शरीरातील घातक सूक्ष्मजीव बाहेर पडतात. त्याचबरोबर राम रक्षा मधील प्रत्यक्ष शब्द हा शक्तिशाली मंत्र आहे ज्याने पोटाचे विकार नष्ट होतात .

त्याचबरोबर ज्या ठिकाणी रामरक्षा स्तोत्र रोज म्हटले जाते तेथे नित्य सात्विक, शांत, सकारात्मक आणि पवित्र स्पंदने निर्माण होतात .स्तोत्र म्हणणे एक प्रकारचे स्तवन .उपास्य देवतेचे तेज पठणकर्त्याच्या शरीरात प्रवेश करते आणि त्याचे मन प्रसन्न होते .

- ❊ चिंता कमी होते
- ❊ शांत झोप येते
- ❊ आत्मविश्वास वाढतो
- ❊ मनशांती मिळते
- ❊ वास्तुदोष नष्ट होतात
- ❊ एकाग्रता वाढते
- ❊ इच्छापूर्ती होते .

त्याचबरोबर लहानपणीच मुलांना जर रामरक्षा शिकवली, त्यांच्याकडून पठण करून घेतली तर त्यांचे उच्चार स्पष्ट . मुलांमध्ये असणारा तोतरेपणा ,बोबडेपणा, जीभ जड पडणे हे विकार दूर होतात. मनोबल वाढते, अभ्यासामध्ये प्रगती दिसून येते त्याचबरोबर इतर कसल्याही प्रकारचा दोष जवळ फिरकत नाही .या स्पर्धेच्या धकाधकीच्या जीवनामध्ये मनशांती मिळविण्यासाठी, आरोग्य संपदा जपण्यासाठी रामरक्षा हे अतिशय फलदायी स्तोत्र आहे. त्यातील प्रत्येक श्लोक आपले रक्षण करते. अबाल वृद्धांनी आज रामनवमी राम जन्मदिनी रामरक्षा' म्हणण्याचा, ऐकण्याचा संकल्प केला तर निश्चितच फलप्राप्ती होईल'' जय श्रीराम'

– सो .अश्विनी वासुदेवराव टेकाळे ( जोशी)

पान १ /४ वरून पुढे...

## प्रभू रामाचे चरित्र....

श्रीराम कथा राधा गोविंद मंदिरामध्ये कथन करताना सांगितले की, प्रभू रामचंद्रांचे चरित्र हे आदर्श घेण्यासारखे आहे. आदर्श राजा, पिता, पुत्र, पती आदर्श मित्र अशी ही प्रभू श्रीरामचंद्राची ख्याती आहे. रामनवमी हा त्रेता युगात अयोध्येत श्री रामचंद्रांच्या अवताराचे स्मरण करणारा एक हिंदू सण आहे. वैदिक शास्त्रे पुष्टी करतात की भगवान कृष्ण किंवा भगवान विष्णू रामचंद्र म्हणून ओळखल्या जाणाऱ्या प्रिय अवताराच्या रूपात प्रकट झाले, संस्कृती, वीरता, तत्वे, नैतिकता, सुशासन, नम्रता आणि त्यागाचे उदाहरण देणाऱ्या विविध लीलांमध्ये सहभागी झाले. भारतातील प्राचीन धर्मग्रंथांमध्ये, भगवान विष्णू भक्तांना आकर्षित करण्यासाठी आणि दुष्टांचा नाश करण्यासाठी विविध अवतारांमध्ये अवतरतात यावर भर देण्यात आला आहे. त्यांच्या कृती, ज्यांना लीला (वेळ) म्हणून ओळखले जाते, त्यांचे प्रिय भक्त आदरणीय, साजरे आणि चिंतन करतात. भगवान विष्णूचा राम अवतार, किंवा अवतार, देशभरात त्यांच्या शिकवणींचा प्रसार करण्यासाठी अशा दिव्य लीलांद्वारे दर्शविला जातो. रामनवमी ही भगवान रामाच्या मानवी आणि दैवी रूपात अवतरण्याची प्रथा आहे, जी संपूर्ण भारतात, विशेषतः उत्तर प्रदेशातील पवित्र अयोध्या शहरात, जी भगवान रामाचे जन्मस्थान आहे, तेथे अतिशय श्रद्धेने आणि उत्सवाने साजरी केली जाते. रामनवमीच्या आधी, हिंदू चैत्र नवरात्रीत नऊ दिवसांचे उपवास पाळतात, मद्यपान, धूम्रपान टाळतात आणि शरीराच्या विषमुक्तीसाठी प्रार्थना आणि ध्यानात गुंततात. नवव्या आणि शेवटच्या दिवशी, अयोध्या आणि भारतातील इतर शहरे प्रार्थना आणि उत्सवात मग्न होऊन तेजस्वी वधूप्रमाणे स्वतःला सजवतात. रामनवमी भगवान रामाच्या जीवनातील प्रत्येक पैलूचा सन्मान करते.

राम नवमीचा इतिहास– हिंदू पौराणिक कथेनुसार, भगवान रामाचा जन्म याच दिवशी अयोध्येत झाला होता असे मानले जाते. काही भक्तांचा असा विश्वास आहे की भगवान राम हे विष्णूचे अवतार होते जे या दिवशी स्वर्गातून नवजात बाळाच्या रूपात अयोध्येत अवतरले होते.

## सामाजिक एकोपा...

अ‍ॅड.सय्यद यासेर पटेल,बबन वडमारे, गोपाळ धांडे, विष्णू वाघमारे, सुहास पाटील, डॉ.सतिष साळुंके, डॉ. लक्ष्मण जाधव, ड.सुभाष राऊत, सुनिल क्षीरसागर, वैभव स्वामी, दिनेश लिंबेकर, जयतुला खान, सादेक जमा, गणेश वाघमारे,किशोर कांडेकर, अविनाश जावळे, अशोक साळवे, अरुण निकाळजे, सादेक कुरेशी, लक्ष्मण सिरसट, धोंडीराम सिरसट,दीपक कांबळे, दशरथ सोनवणे, प्रमोद दासूद, गौतम बचुटे, संदीपान डोंगरे, बापू पवार, शाहू डोळस, गोवर्धन वाघमारे, महेश आठवले, मायाताई मिसळे, रेशमताई जोगदंड, अरुणाताई आठवले, नाना मस्के, अविनाश जोगदंड, भैय्यासाहेब मस्के, सुभाष तांगडे, प्रभाकर चांदणे, सतिष शिनगारे, धम्मा पारवेकर, नामदेव वाघमारे, शाम वीर, भैय्यासाहेब साळवे,अक्षय कोकाटे, भाऊसाहेब दळवी, ड.श्रीकांत साबळे, महेंद्र वडमारे, सचिन वडमारे, यांच्यासह विविध पक्षाचे पदाधिकारी उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी राजू जोगदंड, मझरखान, रमेश गंगाधरे, सय्यद जफर, सादेक पठाण किसन तांगडे, रफिक भाई फिटर, शेख रोहिल रफीख, सुलतान बाबा, सिद्धीक फारुखी, फरहान बागवान, रणजीत शिनगारे आदींनी परिश्रम घेतले.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अ‍ॅड.सुरेश वडमारे यांनी केले.

## गृह राज्यमंत्री...

व कुटुंबीयांचे सांत्वन करण्यासाठी धनंजय देशमुख यांच्या शेजारी बसलेले होते. पत्रकारांशी संवाद साधताना मोबाईल खाली ठेवला होता त्यानंतर ते बांधकाम सुरू असलेले घराची पाहणी करण्यासाठी चालत गेले. घराची पाहणी करत असताना त्यांनी पीएंकडे मोबाईल मागीतला त्यावेळी पीएंनी माझ्याकडे मोबाईल नाही असे सांगीतले. त्यावेळी मंत्री महोदय यांनी मोबाईल शोधा असे म्हटले. हे वाक्य उपस्थित लोकांपैकी कुणीतरी ऐकून बाहेर वाच्यता केली. परंतु मंत्री महोदय व मी स्वतः जाण्यासाठी गाडीत बसलो असता कोणीतरी मोबाईल आणून माझ्याकडे दिला व तो मोबाईल मी स्वतः मंत्री महोदय योगेश कदम यांच्याकडे दिला. मंत्री महोदयांना त्यांचा मोबाईल मिळाला आहे, हे बाहेर माहीत नसल्यामुळे या अफवा जाणीवपूर्वक पसरवल्या चालल्या आहेत. मंत्री महोदय यांचा मोबाईल चोरी झालेला नाही. कृपया कोणीही अफवांवर विश्वास ठेऊ नये. महाराष्ट्र राज्याचे कर्तव्यदक्ष उपमुख्यमंत्री तथा शिवसेनेचे मुख्य नेते ना. एकनाथजी शिंदे साहेब खासदार डॉ श्रीकांतजी शिंदे साहेब हे देशमुख कुटुंबीयांना मदतीचा एक हात म्हणून स्वतःच्या हक्काचे घर बांधून देत आहेत. देशमुख कुटुंबियांचे सांत्वन करण्यासाठी तसेच त्यांना बांधून देत असलेल्या घराच्या बांधकामाची पाहणी करण्यासाठी वारंवार शिवसेनेचे विविध नेते, मंत्री मस्साजोग येथे येऊन भेट देत आहेत.

## जगाला एकात्मतेची...

कीर्तने ,प्रवचने, अंधश्रद्धा निर्मूलन, बालविवाह प्रतिबंध, अस्पृश्यता निर्मूलन याद्वारे समाज प्रबोधन करून सर्व जगाला एकात्मतेची शिकवण देणारे महान तपस्वी कैकाडी महाराज यांचा जन्म राम नवमीला इ.स.१९०७ मध्ये अहिल्यानगर जिल्ह्यातील श्रीगोंदा तालुक्यातील मांडवगण या गावी झाला. राष्ट्रसंत श्री कैकाडी महाराजांनी आपल्या कारकिर्दीत कोणाकडूनही पैसे घेतले नाहीत. तसेच ते कपडेही फार कमी वापरायचे. साधी राहणे व कधीही अन्न वाया जाऊ देत नसत. तसेच कोणालाही पाया पडू देत नसत तुम्ही देव होऊ नका ,संत होऊ नका, तुम्ही फक्त माणस व्हा माणसं हा संदेश ते समाजाला देत होते. हे विश्वचि माझे घर अशी भावना निर्माण झाल्याने त्यांनी समाज परिवर्तनासाठी स्वतःचा देह झिजवला. त्यांनी महाराष्ट्रासह अनेक प्रांतामध्ये जाऊन समाज प्रबोधन केले.पंढरपूर येथे मंदिर बांधण्यासाठी भाविकांकडून त्यांनी सहस्त्रकोटी नाम जप करून घेतला. कैकाडी मठ हे पंढरपूरचे आकर्षण आहे. भारताच्या ऐतिहासिक आणि प्राचीन काळामधील या मठात भारत माता मंदिर आहे. या मंदिरामध्ये स्वर्गलोक ,पृथ्वीलोक आणि पातळ अशी या मठाची निर्मिती करण्यात आलेली आहे. माशाच्या तोंडाच्या तोंडासारखा मठाच्या प्रवेशद्वाराचा आकार तयार करण्यात आलेला आहे. विविध देवदैवतांच्या,संतांच्या, महापुरुषांच्या ,क्रांतिकारकांच्या मुर्त्या या ठिकाणी बसविण्यात आले आहेत.मठाचे सविस्तर वर्णन सांगितले. ह.भ.प.अनंतकाका मुळे यांनी मर्यादा पुरुषोत्तम प्रभु रामचंद्र यांच्या जीवनावर आधारित प्रवचन केले.यावेळी राजेभाऊ गिरे, ग्रामपंचायत सदस्य दामोदर थोरात, महादेव कुदळे, बाळकृष्ण थोरात,दादा गायकवाड, तुकाराम गायकवाड, संजय घोलप , अँड गणेश वाणी, संतोष भोसले, अंकुश गायकवाड, रामदास मुळे, श्रीराम वायभट, सुरेश ढवळे, सुरेश निर्मळ आदी ग्रामस्थ उपस्थित होते.

पान १ /४ वरून पुढे...

## श्रीरामनवमीला क्षेत्र...

महाराज यांनी श्रीरामनवमी निमित्त सर्व भाविकांनी शुभेच्छा दिल्या. तसेच पुढील नारळी सप्ताह हे परिसरातील गावात होणार असून श्रीरामनवमी ही दरवर्षी गडावर मोठ्या उत्साहात साजरी केली जाणार असल्याचे सांगितले. राम गडाच्या भक्तांसाठी पंढरपूर येथे जागा घेतलेली असून तिथे मठाची उभारणी केली जाणार आहे, त्यासाठी सढळ हाताने मदत करण्याचे आवाहनही स्वामी योगीराज महाराज यांनी केले. यावेळी आ.विजयसिंह पंडित यांनीही सत्ताधारी असलो तरी गडाच्या विकासासाठी विरोधकांनाही सोबत घेऊन काम करु असे सांगितले. तसचे खा.बजरंग सोनवणे यांनी खासदार फंडातून २० लक्ष रुपयांच्या सभागृहाची घोषणा केली. या कार्यक्रमाचे सुंदर असे सूत्रसंचालन सिद्धेश्वर महाराज गायके यांनी केले. ४७ वा नारळी सप्ताह शिदोडमध्ये होणार – यावर्षी ४६ वा फिरता नारळी सप्ताह श्री क्षेत्र रामगड येथे संपन्न झाला. आता ४७ वा नारळी सप्ताह बीड तालुक्यातील शिदोड येथे होणार आहे. येथील ग्रामस्थांनी जय्यत तयारी केली असून त्यांना नारळही देण्यात आले आहे. तसेच त्यानंतर पुढील नारळी सप्ताह बीड तालुक्यातीलच रुई शहाजानपूर, दगडी शहाजानपूर येथे होणार असल्याचे जाहीर करण्यात आले.

## अखिल भारतीय मराठा...

करणाऱ्यांना संधी देण्यात येणार आहे कै आ.अण्णासाहेब पाटील यांचे विचार तळागाळापर्यंत पोहोचवण्यासाठी तसेच बीड जिल्ह्यातील समाजात समाजातील कमी करण्यासाठी जिल्हाभरात काम करण्यात येईल, यावेळी अखिल भारतीय मराठा महासंघाचे मराठवाडा सरचिटणीस मा.विनोद आप्पा इंगोले बीड जिल्हाध्यक्ष मा.बापूसाहेब साळुंके गेवराई येथील समाजसेवक मा.संजय काळे सर बीड जिल्हा उपाध्यक्ष मा.परमेश्वर बप्पा कवचट बीड जिल्हा सरचिटणीस मा.बंडू आप्पा कोलगडे विद्यार्थी जिल्हाध्यक्ष मा.भागवत मस्के महिला जिल्हाध्यक्ष मा.ऑड.सैयद्रा डोईफोडे बीड जिल्हा उपाध्यक्ष रवी डोंगरे बीड जिल्हा संघटक मा.राहुल शिंदे पेठ बीड प्रमुख मा.सागर सपकाळ मा.गणेश ढगे व गेवराई व शिरूर परिसरातील समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## भोजगाव ग्रामपंचायत...

घरकुल मंजूर झाले व त्यांना पहिला हप्ताहिक सुद्धा घरकुल बांधकामाला सुरुवात केली नाही अशा लाभार्थ्यांकडून घरकुलाचे पैसे परत घ्यावेत.घरकुलाचे हप्ते नियमितपणे लाभार्थ्यांना मिळतील याकडे यंत्रणेने कटाक्षाने लक्ष द्यावे, असे बीड जिल्हा परिषदेचे सीईओ यांनी संबंधित इंजिनिअर यांना सांगावे की, कामांची वेळेत आणि दर्जेदार पूर्तता होण्याच्या दृष्टीने यंत्रणांनी प्रत्यक्ष पाहणीवर भर द्यावा. स्थळ पाहणी वेळेत करावी. हप्ता वितरित केल्यावर घरकुलाच्या सुरु केलेल्या कामाची नोंदणी व्यवस्थित ठेवावी. कामाच्या टप्पानिहाय विहित केल्यानुसार लाभार्थ्यांना हप्ते द्यावे,अशी मागणी होत आहे.

## महिलांनी उद्योजक व्हावे....

महिला सक्षमीकरणासाठी आणि उद्योजक होऊन स्वकर्तृत्व सिध्द करणाऱ्या महिलांच्या पाठिशी शिवसेना कायम उभी असल्याचे जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांनी सांगितले. कार्यक्रमास बाहेती सर, सारडा सर, कासटताई, बियाणी ताई, शांता ताई सिकची तसेच गृह उद्योजक महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# शेतकऱ्यांच्या पीक कर्जाची सक्तीची वसुली थाबवा, अन्यथा रुमने हातात घेऊ: जिल्हाप्रमुख उल्हास गिराम

**बीड । प्रतिनिधी**

जिल्ह्यातील शेतकरी मागील दोन वर्षापासून आसमानी आणि सुलतानी संकटा आहे. आर्थिक अडचणीत असताना शेतकऱ्यांनी घेतलेल्या पीक कर्जाची बँका सक्तीची वसुली करत आहेत. ही सक्तीची वसुली बँकांनी तात्काळ थांबवावी अन्यथा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष हातात रुमणे घेऊन, बँक अधिकारी आणि वसुली कर्मचाऱ्यांना पळता भुई करतील. असा इशारा शिवसेना जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांनी दिला आहे. गेवराई तालुक्यातील रांजणी येथील शेतकरी स्व.आकाश श्रीराम रोकडे यांनी आत्महत्या केली. जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांनी त्यांच्या कुटुंबाची सांत्वनपर भेट घेऊन कुटूंबाला आधार दिला. जिल्ह्यातील शेतकरी बांधव गेल्या अनेक वर्षापासून या ना त्या कारणाने आर्थिक संकटात सापडला आहे कधी पीक जोमात असताना अवकाळी चा फटका तर कधी शेतीउत्पादन साहित्याची झालेली

## ● रांजणी येथील आत्महत्याग्रस्त कुटुंबाची गिराम यांनी घेतली भेट

प्रचंड वाढ यामध्ये शेतकऱ्याचे आर्थिक गणित पार कोसळले आहे. अशातच सोयाबीन कापसाला अपेक्षित दर न मिळाल्यामुळे मागील दोन वर्षापासून कापूस व सोयाबीन हे बऱ्याच शेतकऱ्यांनी घरीच साठवून ठेवला आहे. शेतीतील वाढता खर्च, वाढलेली मजुरी दर, अवकाळी आणि सरकारचे दुर्लक्ष यामुळे शेतकरी दुःखाच्या गर्तेत ओढला जात आहे.

शेतातील पीक हमीभाव येईपर्यंत प्रतिक्षा करावी की कमी दराने विकावा या विवंचेत शेतकरी सापडला असता, राज्याचे उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री



अजित पवार नुकतेच जाहीर केले, 'कर्जमाफी होणार नाही पीक, कर्ज तात्काळ भरा', या आदेशामुळे बँक कर्मचारी शेतकऱ्याकडून सक्तीची वसुली करत आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांच्या आत्महत्येत वाढ होऊ शकते, तशीच घटना गेवराई तालुक्यातील रांजणी येथे घडली असून त्या ठिकाणी शेतकरी असलेले आकाश श्रीराम रोकडे यांनी बँकेच्या तगाद्याला कंटाळून आत्महत्या केली या आत्म हत्येला सरकार आणि प्रशासनच जबाबदार आहे. अशा परिस्थितीत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष शेतकऱ्यांच्या सोबत असून शेतकऱ्याना वसुलीसाठी वेठीस धरल्यास हातात रुमणे घेऊन विरोध करू असे प्रसिद्धी पत्रकात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे जिल्हाप्रमुख उल्हास भैया गिराम यांनी केले. या सांत्वनपर भेटी दरम्यान शिवसेना जिल्हा समन्वयक भाई संजय महाद्वार, विधानसभा प्रमुख सुशील पिंगळे, तालुका प्रमुख अजय दाभाडे, नवनाथ प्रभाळे, सहशिवसैनिकउपस्थित होते.

## महत्वाचे

### श्रीराम नवमी निमित्त अखंड हरिनाम सप्ताह व शिवपुराण कथा सोहळ्याचे आयोजन ; भाविक भक्तांनी लाभ घ्यावा

**माजलगाव । प्रतिनिधी**



शहरातील नवनाथ नगर येथे सोळा वर्षापासून श्रीराम नवमी सोहळा साजरा केला जातो निमित्त याहीवर्षी अखंड हरिनाम सप्ताह व श्री ह.भ. प. परमेश्वर महाराज फपाळ यांच्या वाणीतून दिनांक ०६ एप्रिल ते १२ एप्रिल २०२५ पर्यंत शिवपुराण कथा होणार असून या कथेचा लाभ घ्यावा असे आवाहन समस्त नवनाथ नगर महिला मंडळ माजलगाव यांच्या वतीने करण्यात आले आहे. प्रति वर्षाप्रमाणे गेल्या सोळा वर्षापासून अखंड हरिनाम सप्ताह श्री ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण तथा संगीत कथा प्रवक्ते श्री ह.भ.प. परमेश्वर महाराज फपाळ यांच्या सुश्राव्यवाणीतून कथा होणार आहे तसेच संगीत साथ शिथवादक व गायक श्री एकनाथ महाराज कोंडवणे, तबला विशादक श्री संदीप महाराज नरके यांची साथ लाभणार आहे व विष्णू सहस्त्रनाम नेतृत्व श्री श्रीरामजी मुंदडा, ज्ञानेश्वरी नेतृत्व सौ. मीराताई डहाळे, शिवहर गायगवे यांचे असणार आहे या सप्ताहामध्ये दैनिक कार्यक्रम पुढील प्रमाणे सकाळी ०७ ते ०८ विष्णू सहस्त्रनाम, ०८ ते ११ ज्ञानेश्वरी पारायण, ०१ ते ०४ नामास कीर्तन भजन, मंगळवारी सुंदर कांड, ०५ ते ०६ सामूहिक हरिपाठ महिला मंडळ नवनाथ नगर व तसेच रात्री ०७ ते १० शिवपुराण कथा होईल तसेच या कथेची सांगता १२ एप्रिल रोजी श्री.ह.भ. प.परमेश्वर महाराज फपाळ यांच्या काल्याच्या कीर्तनाने होईल व महाप्रसाद श्री नरेंद्र प्रभाकर डुकरे यांच्या वतीने होईल तरी सर्व कार्यक्रमांचा पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी लाभ घ्यावा असे आवाहन नवनाथ नगर महिला मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

### बीड जिल्ह्यातील नागरिकांच्या तक्रारीचे निवारण होत नसल्या मुळे सर्वसामान्याचे हाल

#### जिल्हाधिकारी कार्यालयाकडून नागरिकांनी ईमेलवर केलेल्या तक्रारींकडे दुर्लक्ष ?

**गेवराई । प्रतिनिधी**

बीड जिल्हाधिकारी कार्यालय सर्वसामान्यांच्या हक्कासाठी व नागरिकांच्या समस्या सोडवण्यासाठी जिल्ह्यातील मुख्य कार्यालयीन आहे. बीड जिल्ह्यात असलेल्या प्रत्येक तालुक्यातून व ग्रामीण भागातून अनेक तक्रारी या कार्यालयात तसेच कार्यालयाच्या ईमेल वर दाखल होत आहेत. परंतु ईमेलवर केलेल्या तक्रारीची दखल जिल्हाधिकारी कार्यालयाकडून घेतली जात नसल्यामुळे गोरगरीब नागरिकांसाठी मोठी अडचण निर्माण होत आहे. प्रत्येक नागरिक आपल्या वेगवेगळ्या समस्या घेऊन या कार्यालयात येत असतात. तसेच स्वतःच्या मोबाईल वरून जिल्हाधिकारी कार्यालयाच्या ईमेलवर आपली तक्रार करतात परंतु तात्काळ या तक्रारीवर कारवाईचे निर्देश न करता या कारवाईला विलंब केला जातो. येथील अधिकारी-कर्मचारी हळुवार गतीने कर्तव्यावर काम करत असल्यामुळे या संदर्भात अनेक अडचणी निर्माण झाल्या आहेत. ज्या लोकांना कार्यालयापर्यंत येणे शक्य नसल्याने ते लोक जिल्हाधिकारी कार्यालयाच्या ईमेलवर आपली तक्रार दाखल करतात. मात्र या तक्रारीतून कुठलीही कारवाई होत नसल्याने सर्वसामान्य नागरिकात प्रशासनाच्या कर्तव्याबद्दल प्रश्नचिन्ह ? निर्माण झाला आहे. जर थेट दाखल केलेल्या तक्रारीचे निवारण या कार्यालयातून होत नसेल तर ईमेलवरच्या तक्रारीचे काय निवारण होईल हेही तितकेच महत्त्वाचे आहे. जिल्ह्यात अनेक ठिकाणी दररोज वेगवेगळ्या समस्या निर्माण होतात आणि याच्या तक्रारी देखील या कार्यालयात दाखल होतात परंतु या कार्यालयातून तक्रारीची दखल न घेतल्यामुळे नागरिकात संताप व्यक्त केला जात आहे. म्हणून जिल्हाधिकारी अविनाश पाठक साहेब याकडे आपण लक्ष घालावे आणि ईमेलवर येत असलेल्या तक्रारींची निवारण करावे अशी मागणी होत आहे.

# वडवणी शहरात विकासाची गुढी आ.प्रकाश दादा सोळंके यांनी उभारली

## शहरात ४८ कोटी रुपयांच्या विकास कामांचे केलं भूमिपूजन

**वडवणी । प्रतिनिधी**

१९९९ साली वडवणी तालुका अस्तित्वात आला. वडवणी ला तेव्हा ग्रामपंचायत अस्तित्वात होती. ग्रामपंचायतला निधी कमी असल्यामुळे पाहिजे तसा विकास करता येत नव्हता. म्हणून अगदी तालुक्याच्या निर्मितीनंतर १७ वर्षातच वडवणीला २०१६ साली नगरपंचायत दर्जा प्राप्त झाला. आणि विकासाची मुहूर्तमेढ चालू झाली. तत्कालीन नगराध्यक्ष राजेभाऊ मुंडे यांच्या नेतृत्वाखाली तत्कालीन पालकमंत्री तथा सध्याच्या मंत्री ना.पंकजाताई मुंडे यांच्याकडून निधी आणून वडवणी पाणीपुरवठा, रस्ते पुलाची अशी ठळक कामे राजेभाऊ मुंडे यांनी केली. आणि सन २०२२ साली यावर्षी नगरपंचायतची दुसरी पुन्हा निवडणूक झाली. राष्ट्रवादी कॉंग्रेस आघाडी आणि भाजप यांच्यात आमने सामने टक्कर होऊन राष्ट्रवादी कॉंग्रेस आघाडी नऊ नगरसेवक जिंकून घेत नगरपंचायत वर सत्ता स्थापन केली .नगराध्यक्षपदी सौ. वंदनाताई शेषेराव जगताप व उपनगराध्यक्षपदी बन्सीभाऊ मुंडे विराजमान झाले. या नगरपंचायत च्या झालेल्या निवडणुकीत आ. प्रकाश सोळंके यांनी येणाऱ्या वर्षांमध्ये या वडवणी करांसाठी ५० कोटी रुपयांची कामे मी मंजूर करतो असा दिलेला शब्द पाळला. आणि आज त्यांच्याच शुभहस्ते जवळपास ४८ कोटी रुपयांच्या कामाचा भूमिपूजन सोहळा वडवणी शहरात अनेक मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये पार पडला. या



कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून युवा नेते जयसिंग सोळंके माजी सभापती जयदत्त नरवडे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून नगराध्यक्ष प्रतिनिधी शेषेराव जगताप हे व्यासपीठावर होते. आदरणीय दादांचा सत्कार नगराध्यक्ष शेषेराव जगताप व मुख्याधिकारी निगळ यांनी केले. युवा नेते जयसिंग सोळंके यांचा सत्कार उपनगराध्यक्ष बन्सीभाऊ मुंडे यांनी केला. त्यानंतर व्यासपीठावर उपस्थित असलेल्या सर्व मान्यवरांचा येथोचित असा सत्कार सोहळा पार पडला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना उपनगराध्यक्ष बन्सीभाऊ मुंडे यांनी वडवणी नगरपंचायत आम्ही दादांच्या अधिपत्याखाली मार्गदर्शनाखाली लढलो. आ.दादा दिलेला शब्द पाळतात हे आम्हाला पाठीमागील तीन वर्षाच्या काळाम ध्ये कळलं आहे.

आणि आ.दादांच्या म ाध्यमातून आम्ही नगरपंचायत चा कारभार पाहत असून हा आलेला निधी आ. दादांच्या माध्यमातून आला असून येणाऱ्या काळामध्ये अजूनही आ.दादांच्या माध्यमातून निधी आणून या वडवणी शहराचा चेहरा मोहरा बदलण्याचे काम आम्ही करू असे येथील जनतेला आश्वासित केले. त्यानंतर माजी नगराध्यक्ष राजेभाऊ मुंडे यांनी आपल्या भाषणात आम्ही विकासासोबत असून होणाऱ्या विकासासाठी आम्ही व आमचे सर्व नगरसेवक सहकार्य करणार असल्याचे जाहीर केले. आताच्या ४८ कोटींची काम यामध्ये पण सहकार्य करू व आ. दादांनी अजून २० कोटी रुपयांचा निधी द्यावा. त्यामध्ये पण सहकार्य करू असे आश्वासित केले.आ.प्रकाश सोळंके यांचे मी आभार मानतो. विकास कामांमध्ये आम्ही राजकारण करणार नाही. असे स्पष्टपणे राजेभाऊ मुंडे यांनी सांगितले. यानंतर कार्यक्रमाचे अध्यक्ष शेषेराव बापू जगताप यांनी आपल्या भाषणात आ. दादांनी वडवणी शहरासाठी मागितल्यापेक्षा काकणभर जास्त दिले असा आवर्जून उल्लेख केला.

# बोधगया मुक्ती आंदोलनास पाठिंबा ; वडवणी ते बीड लाँग मार्च

### ● ढेकणमोहा येथे पाया लोंग मार्च चे स्वागत

**बीड । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील ढेकनमोहा येथे बीड ते वडवणी निघालेल्या पायी लॉन्ग मार्च चे स्वागत ढेकनमोहा येथे करण्यात आले.

भारतीय बौद्ध महासभा व बौद्ध अनुयायी वतीने महाबोधी बुद्ध विहार बौद्धांच्या ताब्यात देण्यात यावे म्हणून अदौलनास पाठींबा. पायी लॉन्ग मार्च चे नागवंशी बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेच्या संकल्पनेतून महाबोधी महाविहार बुद्धगया मुक्ती आंदोलन वडवणी ते बीड पायी गाँग मार्च जिल्हाधिकारी कार्यालय बीड येथे



धडकणार आहे. सदरील पायी लॉन्ग मार्च चे आयोजक लोक कवी वामनदादा कर्डक कलामंच, भारतीय बौद्ध महासभा, बहुजन विकास मोर्चा. ऑल इंडिया पंधर सेना, ड. गौतमदादा भालेराव मित्र मंडळ, बीड जिल्हा यांच्यावतीने पायी लॉन्ग मार्च काढण्यात आला. ढेकण मोहा येथे सदरील पायी लॉन्ग मार्च आला असता यावेळी नागेश शिंदे माजी सरपंच ढेकनमोहा, बाबासाहेब शिंदे माजी ग्रामपंचायत सदस्य, प्रकाश खळगे आण्णासाहेब म्हस्के, सुभाष तांगडे युवा रिपाइं अध्यक्ष बीड हेमंत, सौदरमल दीलीप कांबळे राहुल कोरडे, दत्ता शिंदे, अरविंद शिंदे, विनोद तुकाराम शिंदे, नवनाथ शिंदे, कचरा अप्पा शिंदे, भैय्या हरणावळ, विकास शिंदे आदि यावेळी उपस्थित होते.

# नारायणराव थोरात यांची अखिल भारतीय मराठा महासंघाच्या मराठवाडा उपाध्यक्ष पदावरून कार्यमुक्त

**बीड । प्रतिनिधी**

अखिल भारतीय मराठा महासंघाच्या मराठवाडा उपाध्यक्ष पदावरून नारायणराव थोरात यांना मा.प्रमोद जाधव अखिल भारतीय मराठा महासंघ राष्ट्रीय कोषाध्यक्ष व मराठवाडा विभागीय अध्यक्ष मा गोपाळराव चव्हाण यांच्या आदेशावरून कार्यामुक्त केले आहे ,नारायण थोरात यांनी संपादक व पत्रकार यांच्या समोर,कै.आ. अण्णासाहेब पाटील संस्थापक अध्यक्ष अखिल भारतीय मराठा महासंघाच्या सार्वजनिक ठिकाणी आ शब्द वापरून अखिल भारतीय मराठा महासंघाचा अवमान केल्याप्रकरणी तातडीने अखिल भारतीय मराठा महासंघाचे मा.प्रमोद जाधव साहेब अखिल



भारतीय मराठा महासंघ राष्ट्रीय कोषाध्यक्ष,व मराठवाडा विभागीय अध्यक्ष गोपाळरावजी चव्हाण साहेब यांनी कार्यमुक्तीचा आदेश काढलाला आहे यापुढे अखिल भारतीय मराठा महासंघाच्या नारायणराव थोरात यांचा कुठलाही संबंध नाही अखिल भारतीय मराठा महासंघाच्या बीड जिल्ह्याच्या वतीने त्यांच्या शब्दाचा जाहीर निषेध करत आहे.

# व्हिएतनाम, हनोई येथील आंतरराष्ट्रीय योग स्पर्धेत बीडच्या योगतज्ज्ञ राधा घोलप (तांबे) यांना दोन सुवर्णपदके

**बीड । प्रतिनिधी**

नुकतीच हनोई, व्हिएतनाम येथे वर्ल्ड योगा स्पोर्ट्स फेडरेशनतर्फे दहावी आंतरराष्ट्रीय योग स्पर्धा पार पडली. या स्पर्धेत जगभरातील नामांकित योगपटूंनी विविध वयोगटांत सहभाग घेतला. बीड जिल्ह्यातील सुप्रसिद्ध योगतज्ज्ञ श्रीमती राधा घोलप (तांबे) यांची या आंतरराष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाली होती.

योग क्षेत्रात प्राविण्य मिळवलेल्या



श्रीमती राधा तांबे यांनी आपल्या उत्कृष्ट योग सादरीकरणाच्या जोरावर दोन सुवर्णपदके जिंकून देशाचे नाव जागतिक स्तरावर उंचावले. त्यांनी रीदमिक आणि ट्रेडिशनल अशा दोन्ही प्रकारांत सुवर्णपदके मिळवत पुन्हा एकदा आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवला.

बीड जिल्ह्याची ख्याती जागतिक स्तरावर पोहोचवण्याचे श्रेय श्रीमती तांबे यांच्या मेहनतीला जाते. अनेक संघर्षांचा सामना करत, कोणत्याही आर्थिक पाठबळाशिवाय, त्यांनी स्वतः च्या जिद्दीच्या जोरावर हे यश संपादन केले. आतापर्यंत त्यांनी थायलंड, नेपाळ आणि आता व्हिएतनाम-अशा तीन आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये सुवर्णपदके पटकावली आहेत.

नेव्हर गिव्ह अप हा त्यांचा दृष्टिकोन, अविरत मेहनत करण्याची तयारी, चिकाटी आणि जिद्द यामुळे त्या सतत नवे शिखर गाठत आहेत. आज त्या असंख्य महिलांसाठी प्रेरणास्त्रोत बनल्या आहेत. जहाँ चाह होती है, वहाँ राह भी मिलती है या वचनाची प्रचिती त्यांच्या जीवनसंघर्षाकडे पाहिल्यावर येते.

महाराष्ट्राच्या मातीत जन्मलेल्या या कर्तृत्ववान महिलेसाठी हा अत्यंत अभिमानाचा क्षण आहे. आपल्या परिश्रमाने आणि आत्मबळावर परदेशात भारताचे नाव उज्वल करणाऱ्या या वीरांगनेचे संपूर्ण जिल्ह्यात, तसेच विविध स्तरांतून कौतुक होत आहे.

CMYK

दैनिक
● epaper.marathwadapatra.com
# मराठवाडा पत्र
सोमवार, दि.०७ एप्रील २०२५ पान ४

## विजेचा शॉक लागून युवा उद्योजक प्रशांत मदुरे यांचा जागीच मृत्यू



**तलवाडा । प्रतिनिधी**

गेवराई तालुक्यातील तलवाडा येथील सुप्रसिद्ध व्यापारी असणारे तथा युवा उद्योजक प्रशांत मदुरे हे रात्री साडेअकरा वाजता आपल्या राहत्या घरी कुलर चालू करण्यासाठी गेले असताना त्या कुलर मध्ये करंट उतरल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. तलवाडा व तलवाडा परिसरातील नागरिकांनी हळहळ व्यक्त केली आहे मदुरे परिवारांच्या कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे त्यांच्या पश्चात आई वडील दोन मुले तीन बहिणी असा मोठा परिवार आहे मदुरे परिवाराच्या दुःखामध्ये दैनिक मराठवाडा पत्र सहभागी आहे.

# शेतकऱ्यांविषयी वारंवार वादग्रस्त वक्तव्य;
# कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांना मानसोपचारासाठी येरवड्याला पाठवा

## वैद्यकीय उपचारासाठी मदतनिधी अजितदादांना पाठवणार : डॉ.गणेश ढवळे







**लिंबागणेश । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्याचे कृषिमंत्री माणिकराव कोकाटे शेतकऱ्यांबाबत वारंवार वादग्रस्त विधान करत असुन त्यांचे मानसिक संतुलन बिघडले असुन शेतक-यांना दिली जाणारी कर्जमाफी स्वतःच्या खिशातून देणार आहेत का?? त्यांचे मानसिक संतुलन बिघडले असुन त्यांना मानसोपचारासाठी पुणे येथील येरवडा याठिकाणी भरती करण्यात यावे अशी मागणी करत बीड तालुक्यातील लिंबागणेश येथील शेतकऱ्यांनी उपचारासाठी लागणारा वैद्यकीय मदतनिधी गोळा करून राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांना पाठवणार असल्याचे डॉ.गणेश ढवळे यांनी म्हटले आहे.

कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांनी पाठीमागे हल्ली भिकारी देखील एक रुपया घेत नाही.आम्ही शेतकऱ्यांसाठी एक रूपयात पिक विमा योजना लागू केली आहे असे वादग्रस्त वक्तव्य केले होते याविषयी शेतकऱ्यांनी तिव्र नाराजी व्यक्त केली होती. त्यानंतर दोन दिवसांपूर्वी अवकाळी पावसामुळे फळबागांची पाहणी करताना कर्जमाफीच्या मुद्यावरून शेतकऱ्यांना कर्ज घ्यायचे आणि ५ ते १० वर्षं कर्जमाफी व्हायची वाट पहायची.तोपर्यंत कर्ज भरायचे नाही . तसेच कर्जमाफी झाल्यानंतर तुम्हाला पैसे येतात. त्या पैशाचं तुम्ही काय करता? त्या पैशातून शेतीमध्ये एक रुपयाची तरी गुंतवणूक आहे का? शेतकरी म्हणतात की कर्जमाफी करा आणि त्यातुन साखरपुडे,लग्न करतात. या असंवेदनशील वक्तव्याचा सर्वत्र निषेध व्यक्त करण्यात येत असुन कृषीमंत्री कर्जमाफी स्वतःच्या खिशातून करतात का? वारंवार शेतकऱ्यांविषयी बरळत असतात.त्यांचे मानसिक संतुलन बिघडले असुन त्यांना येरवड्याला भरती करा. वैद्यकीय उपचारासाठी आम्ही निधी गोळा करू असे म्हणण तिव्र संताप व्यक्त केला आहे.



*बीड: श्री.सोमेश्वर महादेव मंदिर परिसरातील श्रीरामकृष्ण मंदिर येथे राम लल्ला जन्मोत्सव साजरा करण्यात आला.या वेळी श्री प्रभू श्रीरामची महाआरती करताना सोमेश्वर संस्थान चे अध्यक्ष नवनाथ अण्णा शिराळे , सौ . रुक्मिणी शिराळे,ड.गोविंद शिराळे, ॲड. सोनम शिराळे परिवार छायाचित्रात दिसत आहे.*



*बीड: एकनाथ नगर, भक्ती कंन्स्ट्रक्शन येथील संत गजानन महाराज मंदिरातील श्री राम मुर्तीची मुख्य आरती आज रामजन्माच्या दिवशी शिवसेनेचे जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांच्या हस्ते करण्यात आली. तसेच शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या नुतन जिल्हाप्रमुख पदी निवड झाल्याबद्दल उल्हास गिराम यांचा प्रतिष्ठान च्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी शिवतीर्थ प्रतिष्ठान चे संथापाक राजेश पिंगळे, सुरेश शेठ पिंगळे, पिंगळे तात्या, मुकुंद भालेकर, पंकज कुटे, अभिषेक पिंगळे यांच्या सह शिवसेना चे राजा भाऊ माहुवाले, सुशील पिंगळे, नवनाथ प्रभाळे, दिलीप नाना पवार, गणेश थोरात, शरद पवार, सतीशसिह परदेशीं, पिंटू माने सह परिसरातील शेकडो भाविक उपस्थित होते.*

## आष्टीत महात्मा फुले व डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त 115 रक्तदात्यांनी केले रक्तदान

### ●क्रांती बहुउद्देशीय सेवा भावी संस्था व रावण सोशल फाउंडेशनचा स्तूत्य उपक्रम

**आष्टी । प्रतिनिधी**



आष्टी शहरातील सामाजिक संस्था क्रांती बहुउद्देशीय सेवा भावी संस्था व रावण सोशल फाउंडेशन या संस्थेच्या वतीने महात्मा ज्योतिबा फुले व डॉ बाबासाहेब आंबेडकर या गुरू शिष्यांच्या जयंतीनिमित्त रविवार दि ६ एप्रिल रोजी आष्टी येथील ड बी डी हंबर्डे महाविद्यालयात रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले होते या शिबिराचे उद्घाटन आष्टी तालुका युवा पत्रकार संघाचे अध्यक्ष अविनाश कदम यांच्या हस्ते करण्यात आले याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून आष्टी तालुका वकील संघाचे उपाध्यक्ष ड किशोर निकाळजे, पत्रकार मारूती संत्रे आदी मान्यवर उपस्थित होते. या रक्तदान शिबिरात ११५ युवक रक्तदात्यांनी रक्तदान केले.आष्टी शहरात सामाजिक क्षेत्रात अग्रेसर असणारी क्रांती बहुउद्देशीय सेवा भावी संस्था व रावण सोशल फाउंडेशन या संस्थेच्या वतीने गुरू शिष्यांच्या जयंती निमित्त रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते या रक्तदान शिबिरामध्ये ११५ युवक रक्तदात्यांनी रक्तदान केले रक्तदान शिबीर यशस्वी करण्यासाठी आयोजक संस्थापक अध्यक्ष सुहास पगारे, वीरेंद्र निकाळजे, विजय शिंदे,गौरव निकाळजे,ओम लष्कर, सौरभ निकाळजे, कुणाल निकाळजे, सनी मस्के, शाहू निकाळजे, ॲड.विशाल कांबळे, संदीप पगारे, गोरख निकाळजे आदींनी परिश्रम घेतले.

## दुर्गा फार्मा मेडीकलचा थाटात शुभारंभ

**बीड । प्रतिनिधी**



बीड शहरातील सहयोग नगर भागामध्ये दुर्गा फार्मा या मेडीकलचा शुभारंभ बीडचे जिल्हा शल्य चिकीत्सक डॉ.अशोकराव थोरात यांच्या शुभहस्ते दि. ४ एप्रिल रोजी करण्यात आला.

येथील राजेश टाक यांचे चिरंजीव वैभव टाक यांनी डी.फार्मसीचे शिक्षण घेवून औषध क्षेत्रात व्यवसाय करण्याचे त्यांचे स्वप्न होते. त्यांनी शहरातील सहयोग नगर भागामध्ये दुर्गा फार्म मेडीकल सुरु केले असून त्याचा शुभारंभ जिल्हा शल्य चिकीत्सक डॉ.अशोकराव थोरात यांच्या हस्ते करण्यात आला. या उद्घाटन प्रसंगी महाराष्ट्र केमीस्ट ॲण्ड ड्रगीस्ट संघटनेचे उपाध्यक्ष अरुणदादा बरकसे, डॉ.पी.के.कुलकर्णी, डॉ.स्वप्नील ढाकणे, डॉ.एच.सी. रॉय, डॉ.गोपाळ मेखे, भरतअण्णा लोळगे,प्रसिद्ध उद्योजक मंगेश लोळगे, सुरेश सोळंके यांची प्रमुख उपस्थिती होती.




## महिलांनी उद्योजक व्हावे ही माहेश्वरी समाजाची भूमिका प्रेरणादायी : सचिन मुळूक

### ●पद्माक्षी प्रदर्शनाचे बीडमध्ये मुळुक यांच्या हस्ते उद्घाटन

**बीड । प्रतिनिधी**

माहेश्वरी समाजा तिल आयोजक पद्मा ताई हेमंत बियाणी, मीनाक्षी ताई अमित सिकची यांनी पद्माक्षीच्या माध्यमातून महिलांना उद्योजक बनण्यासाठी नवीन व्यासपीठ उपलब्ध करुन दिले आहे. समाजातील महिलांनी केवळ चार भिंतीपुरते मर्यादीत न राहता त्यांनी उद्योजक बनावे ही माहेश्वरी समाजाची भूमिका खरोखरच प्रेरणादायी आहे आसे शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांनी सांगितले.

माहेश्वरी समाजातील महिलांच्या वतीने शनिवारी (दि.५) शहरातील बालाजी मंदिर येथे आयोजित पद्माक्षी प्रदर्शनाचे उद्घाटन मुळूक यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ते बोलत होते. या प्रदर्शनात बारा जिल्ह्यातील महिला वितरक सहभागी आहेत. कार्यक्रमास शिवसेना जिल्हाप्रमुख स्वप्नील गलधर, आयोजक पद्मा ताई हेमंत बियाणी, मीनाक्षी ताई अमित सिकची, जगदीश सिकची उपस्थित होते. यावेळी मुळूक म्हणाले की जन्मजात अंगी असणारी विविध कौशल्ये आणि क्षमतांचा विकास साधत महिला प्रत्येक क्षेत्रात आपले कर्तृत्व सिद्ध करुन दाखवत आहेत. महाराष्ट्रातील गरजू महिला आर्थिकदृष्ट्या सक्षम होण्यासाठी शिवसेना कायम प्रयत्नशील आहे. पद्माक्षी प्रदर्शनाच्या निमित्ताने माहेश्वरी समाजाने स्त्रियांना गृहउद्योगातून स्वावलंबी बनविण्याचा प्रयत्न कौतूकास्पद असून या समाजाने सक्षमीकरणाच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. असे कार्यक्रम वारंवार होणे गरजेचे आहे.

▶▶ उर्वरित पान २ वर

## अखिल भारतीय मराठा महासंघाची संवाद बैठक संपन्न



**गेवराई । प्रतिनिधी**

हभप शिवाजी महाराज यांचे आशीर्वाद घेऊन गेवराई ,शिरूर का. तालुक्यातील आढावा बैठक मागील कामाचा आढावा जुने नव्हे पदाधिकारी यांच्या काही निवडी तसेच जुन्या पदाधिकाऱ्याच्या बढती करण्यात आल्या राष्ट्रीय अध्यक्ष मा, राजेंद्र कोंढरे साहेब तसेच मराठवाडा अध्यक्ष गोपाळरखव चव्हाण यांच्या आदेशावरून मा. विनोद आप्पा इंगोले यांच्या मार्गदर्शनाखाली ता.शिरूर कासार तालुक्यातील पौडुळ येथील विद्यमान सरपंच बापूसाहेब मराडे यांची जिल्हा उपाध्यक्षपदी तर ता.गेवराई येथील श्याम गायकवाड यांची जिल्हा उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली, तसेच बीड जिल्हा प्रसिद्धीप्रमुख पदी सुरेश गिराम, रामनाथ महाडिक यांची गेवराई ता उपाध्यक्षपदी,

संजय भाऊ सगळे यांची गेवराई सचिव, सर्वांच्या निवडी करून पुढील कार्यास शुभेच्छा देण्यात आल्या यावेळी मार्गदर्शन करताना मा.विनोद आप्पा इंगोले म्हणून मनोगत व्यक्त करताना जिल्ह्यातील अ.भा.मराठा महासंघाच्या कामाचा आढावा घेऊन बरेच वीस पंचवीस वर्षापासून पदाधिकारी एका पदावर आहेत त्यांना बढती देऊन नव्या इच्छुक समाजातील काम

▶▶ उर्वरित पान २ वर

## भोजगाव ग्रामपंचायत अंतर्गत जवळपास 50 लाभार्थ्यांचे घरकुल मंजूर!

### संबंधित इंजिनिअर यांनी लाभार्थ्यांच्या घराची पाहणी व सर्वे करूनच घरकुलचा हप्ता वर्ग करावा!

**गेवराई । प्रतिनिधी**



लाभार्थ्यांचे घराचे स्वप्न पूर्ण होणार आहे. प्रत्येकाला स्वत:चे घर असावे यासाठी शासन पुढाकार घेत आहे. केंद्र शासन आणि राज्य शासन विविध योजनांच्या माध्यमातून प्रयत्नशील आहे. सुलभ शौचालय योजनांचा लाभ घेऊन त्याचा वापर होणे आवश्यक आहे. घरकुल योजनेअंतर्गत आपले स्वप्नातील घर बांधण्याची ही सुरुवात असून भविष्यात कुटुंबातील सदस्यांची संख्या वाढत जाते आहे.

गेवराई तालुक्यातील भोजगाव व कोमलवाडी ग्रुप ग्रामपंचायत अंतर्गत यांनी प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत सर्व घरकुल लाभार्थ्यांना आपल्या हक्काचे घर मिळवून देण्याच्या दृष्टीने यंत्रणेने काम करावे, प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत घरकुल निर्मितीचे काम उत्तम दर्जाचे आणि गतीने होण्यावर विशेष लक्ष देण्यात यावे. हे लक्षात घेऊन शासनाच्या विविध योजनांची अधिक पारदर्शकतेने आणि गतिमानतेने अमंलबजावणी करावी. सर्व पात्र ५० लाभार्थ्यांच्या घरकुलास मान्यता दिली आहे घरकुल बांधकाम तत्परतेने सुरू करावे. ज्या लाभार्थ्यांकडे जमीन नाही, बांधायला जागा नाही असे लाभार्थी प्रथम प्राधान्याने घ्यावे. तसेच जागा असलेल्या मात्र घर नसलेल्या लाभार्थीची स्वतंत्र यादी करावी तसेच गेवराई पंचायत समिती अंतर्गत असलेल्या भोजगाव ग्रुप ग्रामपंचायत अंतर्गत प्रधानमंत्री आवास योजना घरकुल योजनेसाठी जवळपास ५० लाभार्थ्यांचे घरकुल मंजूर आहेत. भोजगाव व कोमलवाडी ही ग्रुप ग्रामपंचायत असून, कोमलवाडी येथील मंजूर असलेल्या लाभार्थ्यांच्या घराची पाहणी तसेच सर्वे करूनच संबंधित इंजिनिअर यांनी घरकुल चा हप्ता लाभार्थ्यांच्या खात्यावर वर्ग करावा. तसेच यामध्ये बोगस लाभार्थी आढळून आल्यास त्यांची नावे तात्काळ हटविण्यात यावे, शासनाची दिशाभूल करून मलींदा लाटणाऱ्यावर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी होत आहे. शिवाय संबंधित इंजिनिअर यांनी बोगस हप्ता लाभार्थ्यांच्या खात्यावर वर्ग करू नये, अशी देखील मागणी होत आहे.पंतप्रधान आवास योजना अंतर्गत ज्या लाभार्थ्याला

▶▶ उर्वरित पान २ वर




CMYK